जगतारा टाइम्स

शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६

RNI.NO: MAHMAR/2021/82664

डाळिंब येथील खुनाचा गुन्हा उघड; यवत पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्त कामगिरी, किरकोळ शिवीगाळीच्या रागातून गळा आवळून खून; मृतदेह विहिरीत टाकणाऱ्या आरोपीला बेड्या



यवत: दौंड तालुक्यातील मौजे डाळिंब येथे घडलेल्या भीमाशंकर धोंडीबा खंडागळे (वय ३५ वर्ष) यांच्या खुनाचा गुन्हा यवत पोलीस स्टेशन व पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) संयुक्त पथकाने अवघ्या काही तासांत उघडकीस आणला आहे. याप्रकरणी आरोपी विजय सुभाष नेवमळ (वय ४० वर्ष, रा. डाळिंब, ता. दौंड) यास अटक करण्यात आली आहे.दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारास डाळिंब येथून भीमाशंकर खंडागळे यांचे कोणीतरी अज्ञात कारणासाठी अपहरण केल्याची फिर्याद त्यांची आई मंदा धोंडीबा खंडागळे (वय ५१ वर्ष, रा. डाळिंब) यांनी यवत पोलीस ठाण्यात दिली होती. त्यावरून यवत पोलिसांत भा.न्या.सं. कलम १४०(३) अन्वये अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.तपास सुरू असतानाच दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी डाळिंब गावाच्या हद्दीतील रमेश म्हस्के यांच्या विहिरीमध्ये भीमाशंकर यांचा मृतदेह आढळून आला. मृतदेहाचे हात-पाय लोखंडी तारेने बांधून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने कमरेला मोठा दगड बांधून विहिरीत फेकल्याचे निष्पन्न झाले. यानंतर पोलिसांनी गुन्ह्यात भा.न्या.सं. कलम १०३(१) व २३८ ही खुनाची कलमे वाढवून तपास वेगाने सुरू केला.तपासादरम्यान संशयित विजय सुभाष नेवमळ याला १५ ऑक्टोबर २०२६ रोजी ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, मृत भीमाशंकर याने काही दिवसांपूर्वी किरकोळ कारणावरून शिवीगाळ केल्याचा राग मनात धरून गळा दाबून त्याचा खून केल्याची कबुली दिली. तसेच पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहाचे हात-पाय तारेने बांधून विहिरीत फेकून दिल्याचे सांगितले. यानंतर आरोपीला तात्काळ अटक करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अक्षय मोरे करत आहेत.सदरची यशस्वी कामगिरी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक (पुणे विभाग) डॉ. शुभम कुमार, अपर पोलीस अधीक्षक (बारामती विभाग) गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, सहायक पोलीस निरीक्षक नितीन अतकरे, पोलीस उपनिरीक्षक मारुती मेळकुंदे, पोलीस उपनिरीक्षक अक्षय मोरे, पोलीस उपनिरीक्षक दशरथ नंदीवाले, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर राऊत, सहायक पोलीस उपनिरीक्षक बाळासो भिसे, पोलीस हवालदार संदीप देवकाते, पोलीस हवालदार सुभाष देवकाते, पोलीस कॉन्स्टेबल मारुती बारवकर, पोलीस कॉन्स्टेबल प्रतिक जगताप, पोलीस कॉन्स्टेबल धीरज जाधव, पोलीस कॉन्स्टेबल अमोल भुजबळ, पोलीस कॉन्स्टेबल सचिन गुंड, पोलीस कॉन्स्टेबल प्रतिक रुखडे, पोलीस कॉन्स्टेबल विनीत कुऱ्हाडे, पोलीस कॉन्स्टेबल दिनेश लोणकर तसेच एलसीबी पथकातील सचिन घाडगे, आसिफ शेख, गुरुनाथ गायकवाड, सुभाष राऊत व विकास कापरे यांनी सहभाग घेतला.